महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४६०३

**Ph.No** : (०७२१) २५७३०२७, २५७२५७७ **Website**: www.jdroamt.org

**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in **Fax No**: (०७२१) २५७७९१३

क्रमांक : विकाअ/शिक्षण/कोविड-१९/२०२१/ 1172

दिनांक 12 AUG 2021

**प्रति,**

**प्राचार्य,**

सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,

अमरावती विभाग,अमरावती.

**विषय : कोव्हिड १९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्यासंदर्भात**

**संदर्भ :** १. सहसंचालक,तंत्रशिक्षण,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०२१/३३३ दिनांक १० ऑगस्ट २०२१

२.शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.बैठक-२०२१/प्र.क्र.१३७/विशि-३, दिनांक ३०.६.२०२१

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार कोव्हिड १९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्यासंदर्भात संदर्भिय पत्र १ व २ सोबत जोडलेले आहे. सदर पत्र विद्यार्थ्यांचे निर्देशनास आणून देण्यात यावे तसेच संस्थेच्या सुचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावे.

**(डॉ.आर.पी.मोगरे)**

**प्र.सहसंचालक**

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

अमरावती.

**प्रत:**

१. **प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

२. सुचना फलक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२१/333 दिनांक : 10 AUG 2021

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

विषय :- कोव्हिड १९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्यासंदर्भात

संदर्भ : शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक बैठक-२०२१/ प्र.क्र.१३७/विशि-३, दिनांक ३०.६.२०२१

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, मा.मंत्रीमहोदय,उच्च व तंत्रशिक्षण यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या दिनांक २८.६.२०२१ रोजीच्या बैठकीत राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांना शुल्कासंदर्भाने त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. त्याबाबत सविस्तर बाबी संदर्भाधीन शासन पत्रान्वये सर्व कुलगुरू, सर्व अकृषी विद्यापीठे यांना कळविण्यात आल्या आहेत. सदर पत्र माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी आपणास पाठविण्यात येत आहे.

(प्रमोद नाईक )
सहसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

E:\Budage\2021-22\General Correspondence\Fee Reduction Letter to Universities 30.6.2021.docx

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४१८,

चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१

Email ID : archana.sawardekar@nic.in

---

क्रमांक: बैठक-२०२१/प्र.क्र. १३७/विशि-३ दिनांक :- ३० जून, २०२१.

प्रति,

मा.कुलगुरु,
सर्व अकृषी विद्यापीठे

विषय:- कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या दि.२८ जून, २०२१ रोजीच्या बैठकीच्या अनुषंगाने, सर्व कुलगुरु यांनी दिलेल्या सहमतीनुसार, राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांना खालील मुद्यांच्या अनुषंगाने त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्याबाबत विनंती करण्यात येत आहेः-

(१) ज्या विद्यार्थी / विद्यार्थीनींचे आई/ वडील /पालक कोव्हिड- १९ च्या प्रादुर्भावामुळे मयत झाले असतील अश्या विद्यार्थ्यांचे /विद्यार्थीनींचे पदवी / पदव्युत्तर शिक्षण पूर्ण होईपर्यंतचे संपूर्ण फी माफ करण्यात यावे.

(२) अनुदानित महाविद्यालये व विद्यापीठ विभागातील सर्व अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येणाऱ्या इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन / उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगझीन शुल्क, संगणक शुल्क, क्रिडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टीवल अशा ज्या बाबींवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही त्या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे.

(३) प्रयोगशाळा व ग्रंथालय यांची देखभाल व ग्रंथालयामध्ये ई- कन्टेंट विकत घेण्यासाठी खर्च करण्यात आला असल्याने याबाबतच्या शुल्कामध्ये ५० % सवलत देण्यात यावी.

(४) विद्यार्थ्यांव्दारे वसतिगृहाचा उपयोग करण्यात येत नसल्याने वसतिगृह शुल्कापोटी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे.

(५) विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित महाविद्यालयांत देखील इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन / उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगझीन शुल्क, संगणक शुल्क, क्रिडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टीवल अशा ज्या बाबींवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही त्या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क माफ करण्यात यावे. त्याचप्रमाणे प्रयोगशाळा व ग्रंथालय शुल्क यामध्ये ५० % सवलत देण्यात यावी.

(६) सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात ज्या वर्षाच्या परीक्षा झालेल्या नाहीत त्या वर्षाचे परीक्षा शुल्क पुढील शैक्षणिक वर्षात समायोजित करण्यात यावे.

(७) विद्यार्थ्यांकडे प्रलंबित असलेले शुल्क ३ ते ४ हप्त्यात भरण्याची सवलत देण्यात यावी, तसेच शुल्क थकीत असेल तर परीक्षेचा अर्ज करण्यास अडवू नये. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

आपला,

(अ. म. बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित:-

(१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
(२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
(३) संचालक, कला शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
(४) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे